# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार प्रथमच इ. 10 वी बोर्डाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित**

दिनांक 23 जानेवारी 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त (शिक्षण) संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभाग अंतर्गत महानगरपालिका शाळेतील इ. 10 वी च्या मुलांसाठी बोर्डाची परीक्षा व त्यासाठी पुर्वतयारी याकरीता तज्ञ मार्गदर्शकांद्वारे मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 04 शाळांमधील विद्यार्थी प्रथमच इयत्ता 10 वी ची बोर्ड परीक्षा देणार असल्याने त्याबाबतचे पूर्व नियोजन व तयारी करणे तसेच या शाळांमधील परीक्षार्थी विद्यार्थी 100 टक्के यशस्वी होण्यासाठी पालिका स्तरावर कृती आराखडा आखणे याबाबत तज्ञ मार्गदर्शकांद्वारे मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत महानगरपालिकेच्या इयत्ता 10 वी च्या मराठी माध्यमाच्या 03 शाळा व उर्दू माध्यमाची 01 शाळा याप्रमाणे एकूण 04 शाळांमधील अंदाजे 190 विद्यार्थ्यांकरिता परीक्षेसाठी करावयाचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका सोडविताना उत्तरपत्रिकेचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ याबाबत मार्गदर्शन करणे, उत्तरपत्रिकेवरील बारकोड संबंधित सूचना, होलोक्राफट स्टिकर, युआयडी कोड याबाबत विदयार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी परीक्षा दालनात उत्तरपत्रिका सोडविताना तसेच प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका हाताळताना घ्यावयाची काळजी, परीक्षागृहात विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विविध विषयवार तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन होण्यासाठी 03 टप्प्यांमध्ये सत्राचे नियोजन करण्यात येणार आहे.